# गुजरातमध्ये एअर इंडियाचं प्रवासी विमान कोसळलं

बीड । शुक्रवार
१३.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ७३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■





dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# १,२५,००० लिटर जेट इंधनाने केला घात ?



## एक ठिणगी अन् विमानाचा झाला कोळसा




**अहमदाबाद**

अहमदाबादहून लंडनला जाणारे एअर इंडियाचे एआय १७१ विमान गुरुवार, १२ जून रोजी अहमदाबादमध्ये क्रॅश झाले. अपघाताच्या वेळी विमानात २४२ लोक होते. २३० प्रवासी, १० केबिन क्रू आणि दोन वैमानिक असे या विमनात होते. बोइंग कंपनीने बनवलेले हे ७८७-८ ड्रीम लाइनर मॉडेलचे विमान उड्डाणानंतर लगेचच कोसळले. अहमदाबादच्या मेघानीनगर परिसरात बीजे मेडिकल कॉलेजच्या डॉक्टरांच्या निवासी क्वार्टरवर ते कोसळले. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. आता क्रॅशच्या वेळचे व्हिडिओ समोर आले आहेत. त्यात स्पष्ट दिसत आहे की विमान कोसळताच एका मोठ्या आगीच्या गोळ्यात ते बदलले. प्रश्न असा आहे की, विमान कोसळताच ते आगीच्या गोळ्यात का बदलले? याचे उत्तर तज्ज्ञांनी काय दिले आहे ते पाहूयात.

सर्वात पहिली गोष्ट म्हणजे, हे विमान अहमदाबादहून लंडनला जात होते. म्हणजेच त्याला लांबचा पल्ला गाठायचा होता. ▶▶ उर्वरित पान २ वर

## भिंतींना भगदाड पाडून विमान बीजे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेल आत घुसलं, भरल्या ताटावरच डॉक्टरांनी प्राण सोडले



● गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावर एअर इंडियाचे प्रवासी विमान कोसळल्याची दुर्घटना घडली. बीजे मेडिकल कॉलेज मेघनानी नगर परिसरातच आहे.

हे विमान टेकऑफ केल्यानंतर ५ मिनिटांनी या मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेल इमारतीवर कोसळलं. हॉस्टेलच्या वर एक कॅन्टीन आहे, जिथे दुपारी वैद्यकीय विद्यार्थी जेवणासाठी येतात. बीजे मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर पडलेल्या एअर इंडियाच्या विमानाचे फोटोही समोर आले आहेत. विमानाचा मागचा भाग हॉस्टेल इमारतीवर लटकलेला दिसत आहे. त्याच वेळी, आगीचा भाग पूर्णपणे जळून खाक झाला आहे, ज्यामुळे धूर निघताना दिसत आहे. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास मेडिकल कॉलेजच्या मेसमध्ये सुमारे ५० ते ६० डॉक्टर आणि वैद्यकीय विद्यार्थी जेवण करत होते. काही डॉक्टर्स जागीच गेले, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. घटनास्थळी अग्निशमन दल आणि आपत्कालीन वैद्यकीय पथकांनी धाव घेतली आहे. जखमींना तातडीनं सिव्हिल ▶▶ उर्वरित पान २ वर



## विमान अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचं निधन, पोलीस आयुक्तांची माहिती

● वृत्तसंस्था एएनआयनुसार, विमानात २४२ लोक होते. मिळालेल्या माहितीनुसार, गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे देखील या विमानात होते. अहमदाबादच्या पोलीस आयुक्तांनी विजय रुपाणी यांच्या निधनाची माहिती दिली आहे.

विजय रुपाणी यांचा प्रवास

विजय रुपाणी यांचा प्रवास म्यानमारमधील यांगून ते गुजरातचे मुख्यमंत्री होण्यापर्यंत कसा होता. आरएसएस स्वयंसेवक ते भाजपचे ज्येष्ठ नेते अशी त्यांची कहाणी कठोर परिश्रम



आणि साधेपणाचे उदाहरण आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांनी संघ कार्यकर्त्यापासून मुख्यमंत्री होण्यापर्यंतचा मोठा प्रवास कसा होता.

१९५६ मध्ये म्यानमारमधील यांगून येथे जन्मलेले विजय रमणिकलाल रुपाणी यांचे बालपण साधेपणात गेले. १९६० मध्ये त्यांचे कुटुंब भारतात आले आणि राजकोटमध्ये स्थायिक झाले. लहान वयातच विजय यांचे मन देशसेवेकडे वळले. १९७१ मध्ये, वयाच्या १५ व्या वर्षी ते ▶▶ उर्वरित पान २ वर

## टाटा ग्रुपकडून मृतांच्या वारसांना प्रत्येकी 1 कोटींची मदत

### जखमींचा खर्च उचलणार, वसतिगृह देखील बांधणार




● अहमदाबाद विमान दुर्घटनेत एअर इंडियाच्या बोईंग १७१ फ्लाईटमधील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला असून सुदैवाने १ प्रवासी बचावला आहे. अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवी घटनेनं देश शोकसागरात बुडाला असून २४१ प्रवाशांच्या कुटुंबीयांवर आणि नातेवाईकांवर शोककळा पसरली आहे. एअर इंडिया ही कंपनी टाटा ग्रुपने घेतल्याने या विमान दुर्घटनेनंतर टाटा ग्रुपकडूनही दुःख व्यक्त करण्यात आलं आहे. अपघाताची नैतिक जबाबदारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## ह्या दुर्घटनेत महाराष्ट्रातील सात जणांनी जीव गमावला

● अहमदाबाद विमान दुर्घटनेत २४० प्रवाशांचा मृत्यू झाला असून, यामध्ये महाराष्ट्रातील एकूण सहा जणांनी जीव गमावला आहे. हे सहा जण अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या विमानातून प्रवास करत होते. यामध्ये तीन क्रू मेम्बर आणि एक पायलट तसंच एक दाम्पत्य आहे. त्यांची नावं दीपक पाठक (बदलापूर), अपर्णा महाडिक (गोरेगाव), सुमित सभरवाल (पवई), महादेव पवार (सोलापूर), आशा पवार (सोलापूर), रोशनी सोनघरे (डोबिंवली) आणि मैथिली पाटील (नवी मुंबई) अशी आहेत.

१) दीपक पाठक – दीपक पाठक हे गेल्या पंधरा वर्षांपासून



एअर इंडिया नोकरीला होता. त्यांचं कुटुंब कात्रज भागातील रावल कॉम्प्लेक्स मध्ये गेल्या अनेक वर्षांपासून राहत आहे. सकाळीच टेकऑफ करण्यापूर्वी त्यांनी सोशल मीडियात अपडेट केलं होतं.

२) अपर्णा महाडीक– चिपळूण तालुक्यातील धामेली ▶▶ उर्वरित पान २ वर

## विमान अपघातात प्राण वाचलेले एकमेव प्रवासी... विश्वास कुमार रमेश

### सांगितला अपघाताचा घटनाक्रम

● या अपघातातून ब्रिटिश नागरिक असलेले एकमेव प्रवासी वाचले आहेत. विश्वास कुमार रमेश असं त्यांचं नाव असून ते विमानातील ११ क्रमांकाच्या सीटवर होते अशी माहिती अहमदाबादचे पोलीस आयुक्त जी.एस. मलिक यांनी वृत्तसंस्थेशी बोताना दिली.



विमानानं उड्डाण घेताच ३० सेकंदातच मोठा आवाज झाला आणि विमान कोसळलं. हे एवढ्या कमी वेळात घडलं की, काही समजलं नाही, असं विश्वास माध्यमांशी बोलताना म्हटल्याचं समोर आलं आहे. विश्वास कुमार रमेश यांचे लेस्टर शहरातील नातलग अजय वालगी यांच्याशी आम्ही संपर्क केला. ते म्हणाले, विश्वास यांनी कुटुंबीयांना फोन करुन आपण सुखरुप असल्याचं सांगितलं. प्रवाशांमध्येच असणारे त्यांचे बंधू अजय यांच्याबद्दल काही माहिती नसल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांचे नातेवाईक जमायला सुरुवात झाली. ▶▶ उर्वरित पान २ वर

## वाहतूक कोंडीत अडकल्याने आश्चर्यकारकरित्या वाचली तरुणी

● एअर इंडियाचं विमान अहमदाबाद येथून गॅटिवक ला निघालं होतं. टेकऑफ करताच विमान दुर्घटनाग्रस्त झालं. विमानात एकूण २४२ प्रवासी होते, ज्यामध्ये २ पायलट आणि १० क्रू मेम्बर्स होते. पण आश्चर्यकारकपणे विमानातील दोन प्रवासी वाचले आहेत. यामधील एक प्रवासी रमेश विश्वासकुमार विमानात प्रवास करत होता. तर भूमी चौहान या तरुणीची फ्लाईट चुकल्याने ती वाचली आहे.

भूमी चौहान या तरुणीला अहमदाबादमधील वाहतूक कोंडीने वाचवलं आहे. वाहतूक



सांगितलं आहे.

भूमीने सांगितलं की, मी बाहेर आल्यानंतर मला दुर्घटनेची माहिती मिळाली. यानंतर माझे पाय थरथरायला लागले होते. फार वेळ तिला मानसिक धक्का बसला होता. ▶▶ उर्वरित पान २ वर




# विमानाचा ब्लॅक बॉक्स म्हणजे काय? त्यातून काय माहिती मिळते?

गुजरातमधील अहमदाबादमध्ये विमान कोसळल्याची माहिती समोर येत आहे. अहमदाबाद शहरातील विमानतळाजवळ मेघानीनगर या रहिवाशी भागात हे प्रवासी विमान कोसळलं आहे.

हे विमान एअर इंडियाचे ऋश्चळसहीं ख१७१ होते. उड्डाणावेळेस हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. हे विमान लंडनला गॅटविक येथे जात होते.

विमानात २४२ प्रवासी आणि कर्मचारी आहेत. एअरलाइननुसार, यामध्ये १६९ भारतीय, ५३ ब्रिटिश, १ कॅनेडियन आणि ७ पोर्तुगीज नागरिकांचा समावेश आहे.

अशा प्रकारचा विमान अपघात घडतो, तेव्हा तपासकर्त्यांना विमानाच्या ब्लॅक बॉक्सचा शोध असतो. त्यामुळे, या विमानातील ब्लॅक बॉक्सचा देखील शोध घेतला जाईल. ब्लॅक बॉक्स विमानाच्या मागच्या भागात लावलेला असतो. याआधी नेपाळच्या पोखरा आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ झालेल्या अशाच एका विमान अपघातातदेखील ६० हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. तेव्हा तपास करणाऱ्या समितीचे सदस्य सचिव बुद्धिसागर लामिछाने यांनी बीबीसी नेपाळीशी बोलताना म्हटलं होतं की, ब्लॅक बॉक्स आपल्याला हे सांगतो की अपघात होण्याआधी विमान कोणत्या परिस्थितीत होती, विमानाच्या कोणत्या भागात काय घडत होतं आणि ब्लॅक बॉक्समुळे हे कळतं की अपघातासाठी बाहेरची काही कारणं कारणीभूत आहेत का की अंतर्गत कारणांमुळे असं घडलं?

ब्लॅक बॉक्स म्हणजे काय? – डिजीटल फ्लाईट डेटा रिकॉर्डर (ऊऋऊ) आणि वैमानिकांचा कॉकपिटमधील आवाज (उतठ) रेकॉर्ड करणारं उपकरण याला सामान्य भाषेत 'ब्लॅक बॉक्स' म्हटलं जातं.

विमानाच्या उड्डाणापासून ते लँड होईपर्यंतच्या संपूर्ण प्रवासाची तांत्रिक माहिती, वैमानिकांमधील संभाषण आणि फ्लाईट डेटा या 'ब्लॅक बॉक्स' मध्ये स्टोअर केला जातो. मुंबईतील पायलट अमोल यादव बीबीसीशी बोलताना सांगतात, डिजीटल फ्लाईट डेटा रिकॉर्डरमध्ये विमानातील प्रत्येक साधनाची माहिती डिजीटल पद्धतीने रेकॉर्ड करण्यात येते.

ब्लॅक बॉक्स– विमान किंवा हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झालं. तर, ब्लॅक बॉक्स च्या मदतीने तपास अधिकाऱ्यांना विमानाचा प्रवास, अपघातासाठी काही तांत्रिक कारण जबाबदार आहेत का? नक्की काय घडलं होतं याची अत्यंत महत्त्वपूर्ण माहिती मिळू शकते.

तज्ज्ञांच्या माहितीनुसार, ब्लॅक बॉक्स एक इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस आहे. विमान दुर्घटनेनंतर शेपटीला कमी मार लागतो, म्हणून ब्लॅक बॉक्स शेपटीच्या बाजूला बसवण्यात येतो.

अमोल यादव पुढे म्हणतात, विमान दुर्घटनेनंतर ब्लॅक बॉक्सचं नुकसान होऊ नये यासाठी विमानाच्या शेपटीत ब्लॅक बॉक्सला ठेवण्यात येतो.

ब्लॅक बॉक्स खरंच काळ्या रंगाचा असतो?

विमानाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असलेला हा ब्लॅक बॉक्स खरंतर काळ्या रंगाचा नसतो. हा ब्लॅक बॉक्स केशरी रंगाचा असतो. जेणेकरून विमान अपघातानंतर सहजतेने तपास अधिकाऱ्यांना ओळखता यावा. निवृत्त फायटर पायलट आणि एव्हिएशन तज्ज्ञ विपूल सक्सेना सांगतात, ऑरेंज किंवा केशरी रंग खराब हवामान किंवा इतर परिस्थितीत डोळ्यांनी सहजतेने ओळखता येतो. त्यामुळे ब्लॅक बॉक्स रंग ऑरेंज ठेवण्यात आलेला असतो.

तज्ज्ञ सांगतात, बूट ठेवण्याच्या बॉक्सच्या आकाराचा ब्लॅक बॉक्स असतो.

ब्लॅक बॉक्सच्या आतील भागात थर्मल ब्लॉक असतो. यात मेमरी बोर्ड ठेवण्यात आलेले असतात.

ब्लॅक बॉक्स अत्यंत महत्त्वाचा का आहे?

विमानातील ब्लॅक बॉक्समध्ये विमानाची संपूर्ण माहिती स्टोअर केली जाते.

याचे दोन महत्त्वाचे भाग असतात –

१) फ्लाईट डेटा रिकॉर्डर

२) कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर

तज्ज्ञांच्या मते, फ्लाईट डेटा रिकॉर्डरमध्ये विमानाची तांत्रिक माहिती स्टोर केली जाते. उदाहरणार्थ हवामान, विमानाचा वेग, इंधनसाठा, ऑटो-पायलट स्टेटस, विमानाची उंची आणि दिशा याची माहिती यात स्टोअर करण्यात येते.

ब्लॅक बॉक्सची रेकॉर्डिंग क्षमता २५ तासांची असते.

विपूल सक्सेना सांगतात, फ्लाईट रेकॉर्डरमध्ये हवामान काय होतं, प्रेशर काय होतं, विमानाचा स्पीड काय होता, एखादं उपकरण अचानक बंद झालं तर त्याची माहितीदेखील यात रेकॉर्ड होते.

कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डरमध्ये विमानातील आवाज रेकॉर्ड होतो. यात विमानातील पायलटचं संभाषण आणि एअर ट्रॅफिक कंट्रोलसोबत होणारं संभाषण रेकॉर्ड होतं. यात दोन तासांचं रेकॉर्डिंग केलं जातं.

तज्ज्ञांच्या मते, विमानाला अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला, मानवीय चुकीमुळे झाला किंवा इतर कारणांमुळे याची माहिती तपास अधिकाऱ्यांना मिळू शकते.विमान अपघातानंतर ब्लॅक बॉक्स सुरक्षित राहतो?

ब्लॅक बॉक्सची सुरक्षा अत्यंत महत्त्वाची असते. विमान अपघातानंतर याच्या मदतीनेच दुर्घटनेची माहिती मिळू शकते.

पायलट अमोल यादव याबाबत माहिती देताना सांगतात, ब्लॅक बॉक्समधील रेकॉर्डिंग टेपला इजा होऊ नये किंवा त्या जळू नयेत यासाठी याचं आवरण अत्यंत मजबूत बनवण्यात आलेलं असतं.

ब्लॅक बॉक्स सुरक्षित रहावा यासाठी तो स्टिल किंवा टायटेनियमचा बनवण्यात आलेला असतो.

एक तासापर्यंत १००० अंश सेल्सियस पेक्षाही जास्त तापमानात ब्लॅक बॉक्स सुरक्षित राहतो.

समुद्राचं खारं पाणी किंवा इतर ठिकाणी ६००० मीटर्स खोलपर्यंत हा सुरक्षित राहतो.

विमान समुद्रात क्रॅश झालं असेल तर ब्लॅक बॉक्स शोधण्यासाठी यावर एक बिकन किंवा सिग्नल असतो.

हा अल्ट्रासाउंड सिग्नल अपघातानंतर ३० ते ९० दिवसापर्यंत सिग्नल पाठवतो

सुरक्षा चाचणीसाठी याला ७५० किलोमीटर प्रतितास या वेगाने कॉंक्रिटच्या भिंतीवर आपटलं जातं. पाच मिनिटांकरिता २.५ टन वजन यावर ठेवण्यात येतं.

तपासात ब्लॅक बॉक्स महत्त्वाचा दुवा कसा?

विमानाचा ब्लॅक बॉक्स सापडल्यानंतर तो सर्वप्रथम प्रयोगशाळेत पाठवला जातो.

विमानाच्या स्टोअर डेटामधून आणि पायलटमधील संभाषणातून दुर्घटनेआधी शेवटच्या क्षणी विमानात नेमकं काय झालं होतं, काय सरू होतं याची माहिती तपास अधिकाऱ्यांना मिळते. ज्यावरून तपासाची पुढील दिशा निश्चित होते. निवृत्त फायटर पायलट आणि एव्हिएशन तज्ज्ञ विपूल सक्सेना म्हणतात, अपघातानंतर टेक्निकल आणि ऑपरेशन टीम याचा अभ्यास करते. रिडरच्या माध्यमातून ब्लॅक बॉक्सचा डेटा तपासासाठी ट्रान्सलेट करण्यात येतो. याचा अभ्यास केल्यानंतर विमानाला नक्की काय झालं याची माहिती मिळू शकते. तज्ज्ञ म्हणतात, ब्लॅक बॉक्समधून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास अधिकारी विमान दुर्घटनेच्या आधीचे काही तास रिडिझाइन करतात. याच्या माध्यमातून काही गडबड दिसून आली तर त्याची तपासणी केली जाते.

ब्लॅक बॉक्सचा शोध कोणी लावला?

ऑस्ट्रेलियाच्या संरक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, संशोधक डेव्हिड वॉरेन यांनी सर्वप्रथम ब्लॅक बॉक्सचा शोध लावला. वॉरेन ऑस्ट्रेलियातील मेलबर्नच्या एरोनॉटीकल रिसर्च लॅबमध्ये संधोधक होते. साल १९५० च्या मध्यात एका विमान अपघाताचा डेव्हिड वॉरेन तपास करत होते. त्यावेळी विमानात दुर्घटनेआधी नक्की काय झालं होतं याची माहिती मिळाली तर अधिक चांगलं होईल अशी कल्पना सुचल्यानंतर त्यांनी संशोधन सुरू केलं. १९६० मध्ये ऑस्ट्रेलियात पहिला ब्लॅक बॉक्स विमानात बसवण्यात आला. भारतात २००५ पासून सर्व विमानांमध्ये ब्लॅकबॉस्क अनिवार्य करण्यात आलेत.

पान ४ वरून पुढे...

## सरकारच्या फसव्या...

लागल्या होत्या. या रास्ता रोको आंदोलनात जिल्हाप्रमुख उल्हास गिराम,जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, हनुमान जगताप आशिष मस्के, सहसंघटक रतन गुजर, युवा सेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा ताई नवले विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, काम गार आघाडीचे जिल्हा संघटक रवी वाघमारे, अल्पसंख्यांक आघाडीचे संघटक सय्यद नय्युम, शिव वाहतूक सेनेचे मशरू पठाण, सतीश परदेशी, दिलीप पवार, गणेश लोणकर, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नुकसानग्रस्तांना दिलासा...

साबळेवाडी, इतर गावांमध्ये अनेक ठिकाणी विजेचे खांब कोसळून तारा तुटल्या आहेत. त्यामुळे सध्या विद्युत पुरवठा खंडित झाला आहे. या गावांना भेटीत देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आमदार सुरेश धस यांनी दिलासा दिला आहे. शेतकऱ्यांनी देखील आमदार सुरेश धस हे बांधावर आलेल्या आधार मिळयाच्या भावना व्यक्त केले आहेत. तर सकाळीच महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता डोंगरे, कनिष्ठ अभियंता, तहसीलदार, नायब तहसीलदार,तलाठी, कृषी विभागाचे अधिकारी, गट विकास अधिकारी ग्रामसेवक आणि गावातील प्रमुख कार्यकर्ते यांची तातडीने बैठक घेतली. यामध्ये काल झालेल्या पावसामुळे नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. तसेच प्रशासनाने अत्यंत काळजीपूर्वक शेतकरी आणि नागरिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल आणि कृषी कर्मचाऱ्यांना देण्यात आले आहेत. तरीही नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाशी संपर्क साधावा शासनाकडून नुकसान भरपाई साठी आपण प्रयत्न करणार आहोत असे त्यांनी शेवटी सांगितले.या पाहणी

पान ४ वरून पुढे...

दरम्यान परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, मा. नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, माऊली जरांगे भाऊसाहेब भवर,सरपंच अशोक मुळे,इंद्रजीत गर्जे, अश्रूबा गोल्हार,कारभारी गर्जे,बाबू गर्जे, अशोक जेथे,महेश खेगरे, दादा बेदरे, पाचपुते मुकादम,गाडे सरपंच, पिनू पोकळे, अमोल पोकळे , बाळासाहेब सकुंडे, भाऊसाहेब ससे, तहसीलदार निलावड साहेब,कृषी अधिकारी पवार साहेब ,राख साहेब, विस्तार अधिकारी,ग्राम विकास अधिकारी मंडळ अधिकारी तलाठी व कृषी सहाय्यक यांच्यासह महेश खेगरे, दादा बेदरे, पाचपुते मुकादम,गाडे यांच्यासह संबंधित कृषि विभाग, महसूल विभाग व बांधकाम विभाग आष्टी व पाटोदा तालुक्यात काल झालेल्या वादळ वाऱ्यामुळे महावितरण विभागाच्या वितरण व्यवस्थेतील सर्व सबस्टेशनचा विद्युत पुरवठा खंडित झाला होता.आज सायं.४ वाजेपर्यंत तालुक्यातील ३०/११ के.व्ही.दाबाचे आष्टी,पोखरी,आष्टा ह.ना.,जळगाव कडा कारखाना,कडा शहर,वाहिरा, पिंपळा डोईठाण, पारगाव जो, धामणगाव, दौलावडगाव हे सबस्टेशन दुरुस्त झाले आहेत.या सर्व सबस्टेशन चा विद्युत पुरवठा सुरळीतपणे सुरू केला आहे. आष्टी शहर व मुर्शदपूर शहरातील काही भागात विद्युत पुरवठा अद्याप सुरू झालेला नाही. तो उद्या दुपारपर्यंत सुरू होईल असे उपाभियंता देशमुख यांनी सांगितले. पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, गांधनवाडी, पांढरवाडी डागाचीवाडी, कोतन, उंडेवाडी या गावांसाठी कोतन सबस्टेशन येथुन विद्युत पुरवठा केला जातो.त्या भागात मोठ्या प्रमाणावर विद्युत पोल पडल्यामुळे विद्युत पुरवठा खंडित आहे... तरी पुढील दोन दिवसांमध्ये पोल उभारणी करून विद्युत पुरवठा सुरळीत होईल.

## बीडमध्ये सापडली...

जनावरांची कातडी असल्याची माहिती बीड शहरातील काही गोरक्षकांना समजल्यानंतर नदीपात्राजवळ जाऊन याची खात्री करून माहिती बीड ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. यावेळी पोलीस निरीक्षक

पान ४ वरून पुढे...

खेडकर साहेब यांनी गांभीर्य ओळखत तात्काळ पथक पाठवत मांसाचे नमुने घेत ते चौकशीसाठी पाठवले आहेत. जनावरांची मुंडकी सापडल्याने जनावरांची कत्तल करून मुंडके सिमेंटच्या गोण्यामध्ये भरून करपरा नदी जवळ टाकण्यात आल्याने गोरक्षका मध्ये संताप व्यक्त होत असून जनावरांची कत्तल करून धड, मुंडके, चरबी, हाडे ही उघड्यावर फेकून देत असल्याने आरोपी गोहत्या कायदा पायदळी तुडवत असून यांना कायद्याची भीती नसल्याचे दिसून येत असल्याने अश्या आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विश्व हिंदु परिषदेच्या वतीने करण्यात आली असल्याचे प्रचार प्रसार प्रमुख प्रशांत डोरले यांनी सांगितले आहे.

## बीड तालुक्यातील...

क्षीरसागर यांनी शासनदरबारी पाठपुरावा केला होता. त्यावर आता शासनाने श्री क्षेत्र पोहीचादेव देवस्थानच्या विकासासाठी एकूण ४ कोटी ५४ लाख ५१ हजार रुपयांचा भरघोस निधी मंजूर केला आहे. एकूण निधीपैकी भक्तनिवास बांधकाम करणेसाठी १ कोटी ४० लाख रुपये, भक्त निवास बांधकाम करणेसाठी (स्त्री) १ कोटी ४० रूपये, शौचालय बांधकाम करणे (पुरूष) ५० लक्ष, शौचालय बांधकाम करणे (स्त्री) ५० लक्ष, संरक्षण भिंत बांधकाम करणे व पेव्हर ब्लॉक बसविणे ५० लक्ष, तीर्थक्षेत्र विकास अंतर्गत विद्युत कामे करणे २४ लक्ष ५१ हजार रुपये अशाप्रकारे कामे करण्यात येणार आहेत. दरम्यान बीड मतदारसंघातील देवस्थानच्या विकासासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल बीड विधानसभा म तदारसंघाच्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले असून यासंदर्भात आ.क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. दरम्यान मतदारसंघातील सर्वच समाजाच्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला पाहिजे आणि तो करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असून त्याबाबतचा सातत्यपूर्ण पाठपुरावा शासनदरबारी सुरू असल्याचे आ.संदीप क्षीरसागरांनी सांगितले.

पान ४ वरून पुढे...

## पाण्याच्या टाकीचे...

ठिकाणावर असल्यामुळे पेठ विभागाला पाणीपुरवठा करताना पाणी दाबाची कसलीही अडचण येणार नाही व पूर्ण क्षमतेने पाणी नागरिकांना मिळणार असल्याने ती जागा योग्य आहे. मात्र काही नागरीकानी हुतात्मा स्मारक मधील टाकीचे काम बंद करण्यासाठी नगरपालिकेला निवेदन दिले आहे. व काम थांबवले आहे, मात्र बीड, परभणी व अन्य ठिकाणी स्मारकात पाण्याच्या टाक्या बांधलेल्या आहेत, याची दखल घेवुन आपल्या धारुर शहरात पाण्याचे टाकीचे हुतात्मा स्मारक येथे काम चालु आहे. ते काम मागील काही दिवसापासुन बंद आहे ते काम तात्काळ चालु करावे यासाठी ९ जून सोमवार रोजी शिवसेनेचे अजित शिनगारे यांनी धारूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. मागणीची दखल न घेतल्यास १३ जून रोजी आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा दिला.

## क्या हुवा...

प्रदीप कोठुळे, नयुब पठाण, दादासाहेब सोनवणे, मशरू पठाण, महादेव परस्कार, अक्षय काशीद, राम अंतापुरकर, बाळू वैद्य, सतीश मस्के, रमेश सुरवसे, सखाराम कोरडे, मच्छिंद्र काळे, हनुमान काशीद, चंदूनाना कागदे, गोविंद शिंदे, विशाल पवार, बाळासाहेब लांडे, अशोक चव्हाण, विकास कदम, नितीन कुठे, शिंदे रावसाहेब, गणेश लोणकर, सतीश परदेशी, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर, नारायण काशीद, संतोष काशीद, बाळासाहेब, प्रतीक वाघमारे मारुती वाघचौरे, दाऊद शेख, शरद पवार, राजू गोपाळ, आदी शिवसैनिक उपस्थित होते.

## श्री. क्षेत्र ....

रामदास बडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, माजी सभापती अनिल जायभाये,डिंगाबर नाईकनवरे तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.घोड्यांचे स्वागत व अर्पण विधी गड संस्थानाच्या अध्यात्मिक सेवेसाठी एक ऐतिहासिक घटना ठरली असून, गड परिसरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाले. भाविकांनी या सोहळ्याचे कौतुक करत माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या योगदानाची विशेष दखल घेतली.

पान १ वरून पुढे...

## १,२५,००० लिटर...

त्यासाठी त्याला आपल्या पूर्ण क्षमतेने इंधन भरून उड्डाण करायचे होते. हे विमान बोइंगचे ७८७-८ ड्रीमलाइनर मॉडेलचे होते. यात दोन-क्लास लेआउटसह एकूण २४८ प्रवाशांच्या बसण्याची जागा असते. बोइंगच्या साइटनुसार, एका वेळी याच्या उड्डाणाची रेंज १३,६२० किमी असते. यात GEnx-1B/Trent १००० इंजिन बसवलेले असते. ग्लोबल एअर डॉट कॉम आणि आय ६ ग्रुपच्या अहवालानुसार, या मॉडेलची इंधन क्षमता सुमारे १,२६,००० ते १,२७,००० लिटर असते. या विमानात उड्डाण करताना १,२५,००० लिटर जेट इंधन होते.

आता या अपघाताच्या वेळेकडे लक्ष द्या. अधिकाऱ्यांनी सांगितले की, बोइंग ड्रीमलाइनर विमानाने दुपारी सुमारे १.४७ वाजता उड्डाण केले. उड्डाणाची परवानगी मिळाल्यानंतर ९ मिनिटांनी ते दुर्घटनाग्रस्त झाले. खरेतर या विमानाला अहमदाबादहून लंडनला पोहोचायला ५ तास लागतात. पण ते ९ मिनिटांनंतरच क्रॅश झाले. म्हणजेच, त्यात पूर्ण जेट इंधन जसेच्या तसे शिल्लक होते. त्यामुळे ज्या वेळी विमान कोसळले त्यावेळी त्याचा स्फोट झाला आणि इंधनामुळे प्रचंड आगा निर्माण झाली.

डीजीसीएने क्रॅशची चौकशी केली सुरू

नागरी उड्डयन महासंचालनालयाने (डीजीसीए) गुरुवारी सांगितले की, त्यांनी अहमदाबाद विमान अपघाताची चौकशी सुरू केली आहे. डीजीसीएच्या प्रवक्त्याने सांगितले, या क्षणी अपघाताचे निश्चित कारण कळाले नाही. सविस्तर चौकशी सुरू करण्यात आली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या चौकशीत सर्व संबंधित एजन्सीज सहभागी आहेत.

## भिंतींना भगदाड...

हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आलं आहे. विमान कोसळताना फक्त मेसच नाही, तर शेजारील होस्टेलची इमारतही जोरदार हादरली. अनेक खोलींच्या भिंती पडल्या असून, संपूर्ण हॉस्टेल इमारत धोकादायक स्थितीत आहे. विद्यार्थ्यांना तत्काळ बाहेर काढण्यात आलं असून, संपूर्ण परिसर सील करण्यात आला आहे. या भीषण दुर्घटनेत मृतांची संख्या वाढण्याची शक्यता प्रशासनाने वर्तवली आहे.

## विमान अपघातात...

आरएसएस आणि जनसंघात सामील झाले. त्यांनी महाविद्यालयात

पान १ वरून पुढे...

एबीव्हीपीच्या विद्यार्थ्यांना संघटित केले. १९७५ ची आणीबाणी त्यांच्यासाठी मोठी परीक्षा होती. इंदिरा गांधींविरुद्ध आवाज उठवल्याबद्दल त्यांना तुरुंगवास भोगावा लागला, पण त्यांनी हिंमत गमावली नाही. हा तो काळ होता जेव्हा विजयने देशासाठी काहीतरी मोठे करायचे ठरवले.

१९८७ मध्ये विजय राजकोट महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून रुजू झाले. त्यांच्या कष्टाचे फळ मिळाले आणि १९९६ मध्ये ते राजकोटचे महापौर झाले. लोकांनी त्यांच्या साधेपणाचे आणि कामाच्या आवडीचे कौतुक करायला सुरुवात केली. २००६ मध्ये ते गुजरात पर्यटनाचे अध्यक्ष झाले, त्यानंतर त्याच वर्षी राज्यसभेचे खासदार म्हणून निवडून आले. २०१४ मध्ये राजकोट पश्चिमेचे आमदार झाल्यानंतर ते आनंदीबेन पटेल यांच्या सरकारमध्ये मंत्री झाले. प्रत्येक पावलावर त्यांचे कठोर परिश्रम आणि भाजप संघटनेवरील निष्ठा त्यांना पुढे घेऊन गेली. २०१६ मध्ये, जेव्हा आनंदीबेन यांनी राजीनामा दिला, तेव्हा भाजपने विजय यांना गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून निवडले. तो त्यांच्यासाठी स्वप्नातील क्षण होता.

## टाटा ग्रुपकडून...

स्वीकारत आणि सामाजिक जाणीव ठेऊन टाटा ग्रुपने विमान दुर्घटनेतील जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्च देखील टाटा ग्रुपकडूनच करण्यात येणार असून आवश्यक ती सर्व काळजी आणि मदत जखमींना मिळेल, असे टाटा ग्रुपने म्हटले आहे. तर, विमान अपघातात कोसळलेल्या अहमदाबादम धील बीजे मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहाच्या बांधकामात मदत करण्याचे आश्वासनही टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांच्याकडून देण्यात आले आहे.

टाटा ग्रुपचे चेअरमन एन. चंद्रशेखर यांनी पत्रक जारी करत विमान दुर्घटनेवर शोक व्यक्त केलं. ''एअर इंडिया फ्लाइट १७१ मधील दुःखद घटनेने आम्हाला खूप दुःख झाले आहे. या क्षणाच्या आमच्या दुःखद भावना शब्दात व्यक्त न करता येणाऱ्या आहेत. विमान दुर्घटनेत ज्या कुटुंबीयांनी आपले प्रियजन गमावले आहेत, आणि जे जखमी झाले आहेत त्यांच्यासोबत आमच्या सहवेदान आणि प्रार्थना आहेत. या दुर्घटनेत जीव गमावलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला (वारसांना) टाटा ग्रुपकडून १ कोटी रुपयांची मदत करण्यात येईल. तसेच, जखमींचा वैद्यकीय खर्चही आणि त्यांना आवश्यक ती सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन टाटा ग्रुपकडून देण्यात आले आहे. तसेच, विमान दुर्घटनेमुळे इमारत कोसळलेल्या बी.जे. मेडिकलच्या वसतिगृहाची नव्यानी उभारणी करण्यातही टाटा ग्रुप पुढाकार

पान १ वरून पुढे...

घेईन,'' असे टाटा ग्रुपचे प्रमुख एन. चंद्रशेखरन यांनी जाहीर केले.

बोईंगची टीम तपासासाठी भारतात येणार– एअर इंडियाचं हे अपघातग्रस्त विमान बोईंग कंपनीचे असल्याने आता बोईंग कंपनीतील तज्ज्ञांची टीम भारतात पाठवण्यात येणार आहे. एअर इंडिया दुर्घटनेसंदर्भात तपासासाठी बोईंगकडून टीम येणार असल्याची माहिती टाटाकडून देण्यात आली. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी बोईंगच्या सीईओंसोबत चर्चा केली. दुर्घटनेचे नेमकं कारण काय आहे? याच्या तपासासाठी जीई एरोस्पेस देखील तपासात मदत करण्यासाठी टीम पाठवणार असल्याची माहिती आहे.

## ह्या दुर्घटनेत...

(भोजनेवाडी) गावातील सुनबाई आणि एअर इंडिया या प्रतिष्ठित विमान कंपनीमध्ये क्रू मेंबर म्हणून कार्यरत असलेल्या अपर्णा महाडिक (३५) यांचे अपघातात दुर्दैवी निधन झाले. या अपघाताने कोकणच्या मातीतून आकाशात झेपावलेली एक जबाबदार आणि कर्तव्यनिष्ठ कन्या हरपली आहे. अपर्णा म हाडिक या खासदार सुनील तटकरे यांचे भाचे अमोल महाडिक यांच्या पत्नी होत्या. गेल्या काही वर्षांपासून त्या एअर इंडिया सेवेत कार्यरत होत्या. ३) सुमित सभरवाल– अहमदाबाद विमान दुर्घटनेतील को-पायलट सुमित सबरवाल याच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मुंबईतील पवई परिसरामध्ये सुमित सबरवाल याचे ८८ वर्षाचे वडील एकटेच राहतात. टेकऑफ करण्यापूर्वी सुमितने त्यांच्याशी संवाद साधला होता. लंडनमध्ये विमान लँड झाल्यावर मी पुन्हा बोलेन असं त्याने सांगितलं होतं. पण त्या आधीच त्यांच्यावर काळाने घाला घातला. सुमितच्या पश्चात त्याची बहीण आणि दोन भाचे असा परिवार आहे. ४) महादेव पवार आणि आशा पवार – मूळचे सांगोला तालुक्यातील हातिद गावातील पवार दांपत्याचा विमान अपघातात समावेश आहे. महादेव पवार ( वय ६७) आशा पवार ( वय ५५) यांनी त्यांचा जीव गमावला आहे. लंडनमध्ये त्यांचा मुलगा व्यावसायिक आहे. त्याच्याकडे जाण्यासाठी विमानाने प्रवास करत होते. त्यांचा दुसरा मुलगा अहमदाबाद येथे व्यवसाय करत आहे. ५) रोशनी सोनघरे– अहमदाबाद येथे झालेल्या भीषण विमान दुर्घटनेत डोंबिवलीकर २७ वर्षीय रोशनी सोनघरे हिचा दुर्दैवी मृत्यू झाला. एअर इंडियाच्या अपघातग्रस्त विमानामध्ये रोशनी एअर होस्टेस म्हणून कार्यरत होती. रोशनी ही डोंबिवली पूर्वेकडील राजाजी पथ परिसरातील नव उमीया कृपा सोसायटी मध्ये आपल्या आई-वडिल आणि भावासोबत राहत होती. तिचे वडील राजेंद्र, आई राजश्री आणि भाऊ विघ्नेश

पान १ वरून पुढे...

हे एकत्रच राहत होते . मुंबई ग्रँड रोड परिसरात राहणारे हे कुटुंब दोन वर्षांपूर्वी डोंबिवलीत स्थायिक झालं होतं. रोशनी हिचा भाऊ विघ्नेश हा एका खासगी शिपिंग कंपनीमध्ये काम करतो तर आई-वडील हे घरीच असतात. रोशनीचे शिक्षण मुंबईत झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राजेंद्र सोनघरे व त्यांचे पत्नी राजश्री हिने आपल्या दोन्ही मुलांना शिकवले. रोशनीला लहानपणापासूनच एअर क्रू बनायचं होतं. तिने जिद्द आणि मेहनत करत तिचे स्वप्न पूर्ण केलं. काल आई-वडिलांचा निरोप घेऊन ती अहमदाबादला गेली व अहमदाबादच्या फ्लाईटने ते लंडनच्या दिशेने निघाली होती. मात्र याच विमानाचा अपघात झाला व रोषणाईचा दुर्दैवी मृत्यू झालाय.६) क्लाईव्ह कुंदर – क्लाईव्ह कुंदर पायलट इन कमांड सुमित सभरवाल सह-पायलट होता. मुंबईतील पश्चिम उपनगरात तो वास्तव्यास होता.

## विमान अपघातात....

आम्ही त्याबद्दल अधिक माहिती मिळवण्याच्या प्रयत्नात आहोत. विश्वास यांना पत्नी आणि एक मूल आहे. विश्वास यांचा भारतात जन्म झाला आणि गेली अनेक वर्षं ते इंग्लंडमध्ये राहात आहेत अशी माहिती मिळाली आहे. विश्वश कुमार रमेश हे ४० वर्षांचे असून ते या विमान अपघातातून बचावले आहेत. त्यांनी या घटनेची माहिती देताना म्हटलं की विमानानं टेकऑफ घेतल्यानंतर ३० सेकंदात मोठा आवाज सुरु झाला अन् विमान क्रॅश झालं, हे खूप वेगानं घडलं, असं विश्वश कुमार रमेश म्हणाले. ते या दुर्घटनेत जखमी झाले असून त्यांच्या छाती, डोळे आणि पायाला दुखापत झाली आहे.

## वाहतूक कोंडीत....

तिने सांगितलं की, विमान सुटल्याने आपण नाराज होऊन एक्झिट गेटवर पोहोचलो तेव्हा ते विमान दुर्घटनाग्रस्त झाल्याचं समजलं. माध्यमांशी बोलताना भूमीने सांगितले की, या घटनेची माहिती मिळताच तिचे मन सुन्न झाले. त्यानंतर ती घरी परतली. भूमी लंडनला जाणार होती. ती तिच्या पतीसोबत लंडनमध्ये राहते आणि सुट्टीसाठी भारतात आली होती. तिचा पती अजूनही ब्रिटनमध्ये आहे. फक्त १० मिनिटांच्या उशिरामुळे ती प्रवास करू शकली नाही. ट्रॅफिकमुळे तिला विमानतळावर पोहोचण्यास उशीर झाला. विमान अपघाताची बातमी ऐकताच ती स्तब्ध झाली. माझ्या गणपती बाप्पाने मला वाचवले अशी भावना तिने व्यक्त केली आहे. विमान चुकल्यानंतर ती दुपारी १.३० वाजता विमानतळावरून परतली. भूमी दोन वर्षांपूर्वी लंडनला गेली होती. त्यानंतर ती पहिल्यांदाच भारतात आली होती.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अहमदाबाद विमान अपघातातील घटना स्थळाचे भीषण दृश्य, विमानाची झाली अशी अवस्था...



अपघाततील विमानाचा मागचा भाग एका इमारतीवर दिसत आहे.



विमान कोसळल्यानंतरच्या आगीनं या परिसरात अशी अवस्था झाली.



आग विझवण्याचा प्रयत्न करणारे अग्निशमन विभागाचे कर्मचारी



विमान अपघातानंतर बचाव कार्यासाठी अग्निशमन विभागासह इतर यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या.



विमान कोसळल्यानंतर आगीमुळं विमानाचा अक्षरश: कोळसा झाल्याचं पाहायला मिळालं.



विमान कोसळल्यानंतर लागलेल्या आगीत याठिकाणच्या झाडांचाही अक्षरश: कोळसा झाला



अपघातानंतर पडलेले विमानाचे एक पाते. यावरुन अपघाताची भीषणता लक्षात येते.



अपघाततील विमानाचा भाग दिसत आहे.



प्रचंड धुरामध्ये बचावकार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत होता.

## मा.आ.बच्चू (भाऊ) कडु यांच्या उपोषणाला स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा जाहीर पाठिंबा

**गेवराई । प्रतिनिधी**

स्वाभिमानी शेतकरी संघटना बीडच्या वतीने बच्चुभाऊ कडू यांचे मोझरी येथे सुरू असलेले बेमुदत उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यात आला असून जिल्हाधिकारी बीड यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर सौदागर,जयदेव शिंगणे,राजू गायके यांच्या सह यांनी निवेदन दिले असून.





बच्चुभाऊ कडू यांच्या बेमुदत आंदोलनाची शासनाने दखल न घेतल्यास व मागण्या मान्य न केल्यास बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा दिला असून जर शेतकऱ्यांचा उद्रेक झाला तर याची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील. असे सांगितले आहे.हे निवेदन निवासी जिल्हाधिकारी यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने निवेदन देण्यात आले यावेळी जिल्हाध्यक्ष राजू गायके, उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन,युवा जिल्हाध्यक्ष दिनकर रिंगणे, तालुका अध्यक्ष विलास खिसाडे व स्वाभिमानीचे कार्यकर्ते जयदेव शिंगणे हे उपस्थित होते.

## शिवीगाळ करुन तरुणास मारहाण; किशन तांगडे यांनी घेतली भेट, गुन्हा दाखल

**पाटोदा । प्रतिनिधी**

डोमरी येथील बौद्ध समाजातील प्रशांत जावळे या तरुणास केवळ गाडी का बाजूला घेत नाहीस? या कारणावरून जातीवाचक शिवीगाळ करून रॉड, लाठ्या आणि काठ्यांनी अमानुष मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. सदर घटनेची माहिती मिळाल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते किशन तांगडे यांनी तात्काळ जावळे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली व त्यांना धीर दिला.

या घटनेनंतर किशन तांगडे यांनी आष्टी-पाटोदा विभागाचे उंधडझ बाळकृष्ण हनपुडे साहेब आणि पाटोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जाधव साहेब यांच्याशी सविस्तर चर्चा करून गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यानंतर पोलीस प्रशासनाने संबंधित आरोपींविरोधात रितसर गुन्हा दाखल केला आहे. या वेळी किशन तांगडे यांच्यासोबत ज्येष्ठ नेते आप्पा मिसळे, बंडू ठोंबरे, सूरज जावळे, नितीन गायकवाड, अनिकेत जावळे, धम्मानंद कांबळे, विशाल शिंदे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

## दान पारमिता म्हणजे आपल्याजवळ असलेली कोणतीही वस्तू, पैसा, किंवा शारीरिक शक्ती दुसऱ्यांच्या भल्यासाठी, कोणत्याही अपेक्षा न ठेवता, समर्पित करणे. यालाच 'दान' किंवा 'पारमिता' असे म्हणतात: पूज्ज भंते आचलानंदजी

**बीड । प्रतिनिधी**

धम्मदीप बुद्ध विहार( बलभीम नगर) शिवाजीनगर पालवण रोड बीड विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दुसरे गुरु संत कबीर यांच्या जयंतीचा व जेष्ठ पौर्णिमेचा कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रस प्रमुख धम्मदेसना देण्यासाठी पूर्णा येथील पूज्ज भंते आचलनांदजी व प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक आयु.विनोदजी मुळूक व आयु.कॅप्टन राजाभाऊ आठवले तसेच आयु डी. जी. वानखडेबाबा यांची उपस्थिती होती, या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्याच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध संत कबीर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कॅप्टन आठवले व वानखडे बाबा यांनी बौध्द उपासक उपसिक यांनी आपल्या मुलांवर बुद्ध धम्माचे संस्कार होण्यासाठी बौध्द बांधवानी सर्व प्रकारचे मतभेद दूर ठेऊन प्रत्येक महिण्याच्या पौर्णिमेस व दर रविवारी बुद्ध विहारात येऊन आपले सन उत्सवं एकत्र येऊन साजरा करणे ही कळाची गरज आहे असे मत मांडले तसेच धम्मामधील दान पारमितेचे महत्व सांगितले त्या नंतर पूज्ज भंते आचलानंदजी यांनी जेष्ठ पौर्णिमे बद्दल भगवान बुद्धाच्या जीवनातील प्रसंघ



सांगून धम्मदेसना दिली, शेवटी सरणतंय घेऊन ॲड तेजस वडमारे यांनी आभार प्रदर्शन केले या कार्यक्रमास आयु. जयश्री विशाल वडमारे यांनी खीरदान केले या कार्यक्रमास अंजली तेजस वडमारे, कोमल वाघमारे, सरिता खेमाडे, अर्चना जाधव, आशा धनवे, आचल वडमारे, मालन अंकुटे, जयश्री गवळी, रामाबाई सोनवणे, आम्रपाली गवळी, जानवी वाघमारे, प्रीती जाधव,आशा भालेराव, आयु.विशाल वडमारे, कुलदीप गवळी व शिवाजीनगर बलभीम नगर, मित्र नगर, दिलीप नगर परिसरातील बौध्द उपासक उपासिका, बालक बालिका मोठयासंख्येने उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ८६४/२०२५**

**सिन्धुबाई व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार : (१) सिन्धुबाई छगनराव दहिवाळ वय ८४ वर्ष, धंदा घरकाम, रा. सावता माळी चौक, दुधाळ बिल्डींग, बीड, ता.जि. बीड, (२) सुनील छगनराव दहिवाळ, वय ५४ वर्ष, धंदा व्यापार, रा. दुधाळ बिल्डींगचे मागे, सावता नगर, जिजामाता चौक, बीड ता. जि. बीड (३) संगीता दिनकर बागडे, वय ५७ वर्ष, धंदा घरकाम, रा. श्री साई सदन, मोंढा रोड, दुधाळ बिल्डींगचे मागे मसरत नगर, बीड ता. जि. बीड (४) सविता राधेशाम उडाणसिंह, वय ४९ वर्ष, धंदा घरकाम, रा. कृष्णाई नगरी, गेवराई जोरी ता. गेवराई जि. बीड, (५) वनीता गणेश बेदरे, वय ४७ वर्ष, धंदा घरकाम रा. क्रांती नगर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड

विरुध्द

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ यांचा मृत्यु दि. १८/०२/२०१५ रोजी जिल्हा रूग्णालय, ता.जि. बीड** येथे झाला आहे. अर्जदारक १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे तर अर्जदार क. ३ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कोर्ट कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत छगनराव बप्पाजी दहिवाळ** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११ माहे जून २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १७ जुलै २०२५.

**(मार्फत- ॲड. राम ज. दहिवाळ)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **अधीक्षक**

**(स्वाक्षरीत)** **क.लिपीक** | **शिक्का** | **दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

CMYK

दैनिक **मराठवाडा पत्र**

● epaper.marathwadapatra.com

शुक्रवार, दि.१३ जून २०२५ पान ४

## सरकारच्या फसव्या घोषणाच्या विरोधात शिवसेनेचा रास्ता रोको !

**बीड । प्रतिनिधी**

महायुती सरकार कडून सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी सह अनेक प्रलोभने दाखवली तसेच लाडक्या बहिणींना पण १५०० रुपया वरून २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिलेले होते, मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनाचा महायुती सरकारला विसर पडला सत्तेत आल्या पासून महायुती सरकार सातत्याने शेतकऱ्यावर अन्याय करत असून जुलमी धोरणे राबवून देशोधडीला लावण्याचे काम करत आहे. माहिती सरकारच्या विरोधात उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली आज बीडमध्ये रास्ता रोको संपन्न झाले. क्या हुआ तेरा वादा मनात माहिती सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली यावेळी वाहनांच्या मोठ्या रांगा ▶▶ उर्वरित पान २ वर

## माजी मंत्री धनंजय मुंडे शुक्रवारी बीडमध्ये



**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे शुक्रवारी (दि. १३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांच्या भेटीसाठी बीड शहरात येत असून ते दुपारी एक ते पाच या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयामध्ये भेटीसाठी उपलब्ध राहणार आहेत. मागील काही दिवसांमध्ये सातत्याने आजारपणाने ग्रस्त असलेले धनंजय मुंडे आता मतदार संघासह पक्ष कार्यामध्ये कमालीचे सक्रिय झाल्याचे पाहायला मिळत आहे. बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कामकाजाच्या संदर्भाने तसेच पदाधिकारी कार्यकर्ते यांसह नागरिकांच्या भेटीसाठी धनंजय मुंडे हे शुक्रवारी बीड शहरातील मित्र नगर परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयामध्ये दुपारी एक ते पाच या वेळेमध्ये उपलब्ध राहणार असून सर्व पदाधिकारी सेलचे अध्यक्ष यांचा कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर आबा चव्हाण यांनी केले आहे.

# नुकसानग्रस्तांना दिलासा देण्यासाठी आ. सुरेश धस शेतकऱ्यांच्या बांधावर

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्यभरात मान्सून दाखल होत असताना दि.११ रोजी अचानक झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांना तडाखा बसला आहे. जोरदार झालेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या फळबागा आणि इतर पिकांचे नुकसान झाले असून वीज पुरवठा खंडित झाला आहे या नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार सुरेश शेतकऱ्यांच्या बांधावर प्रशासनाला समवेत घेऊन पोहोचले आणि प्रशासनाला



सूचना देऊन नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे आदेश दिले आहेत.

दि.११ जून रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांची फार मोठे नुकसान झाले आहे. तसेच अनेक गावातील नागरिकांचे घरांची पडझड झाली असून आणि काही शेतकऱ्यांचे कुक्कुटपालन शेड, गोठे, आणि जनावरांची जीवित हानी झाली आहे. आष्टी तालुक्यातील पिंपरीआष्टी, बेलगाव, मुर्शदपूर किन्ही, बावी, कापशी यासह पाटोदा तालुक्यातील अंमळनेर, डागाची वाडी, उंडेवाडी, कोतन, पांढरवाडी, गांधणवाडी,

**● वादळी वाऱ्यासह पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आंबा, उन्हाळी कांदा, कुकुट पालनाचे शेड, विजेचे खांब कोसळून तारा तुटल्या आहेत वादळाचा वेग मोठा असल्यामुळे जुने मोठे वृक्ष उन्मळून पडले आहेत प्रशासनाकडून नुकसानीबाबत पंचनामे सुरू झाले आहेत तरीही कोणी वंचित राहू नये म्हणून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी नुकसानी बाबतचे फोटो काढून प्रशासनाकडे देण्यात यावेत शासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत– सुरेश धस, आमदार , आष्टी**

**● अन शेतकऱ्याला अश्रू अनावर– पाटोदा तालुक्यातील डागाचीवाडी येथे आ. सुरेश धस नुकसानग्रस्त भागाचे पाहणी गेले असता अण्णा तुम्हीच आमचे आधार असल्याचे भावना व्यक्त करत असताना काल रात्रीचा प्रसंग सांगताना अश्रू अनावर झालेले पाहायला मिळणे तर आमदार धस यांनी देखील सर्वो तोपरी मदत करण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्याला दिलासा मिळाला.**

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये सापडली गोवंशाची चक्क मुंडके

### गोहत्या कायदा बीडमध्ये पायदळी, विहिंप घेणार आक्रमक भुमिका

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने गोहत्या बंदी कायदा केला असला तरी बीड शहरात मात्र राजरोस जनावराची कत्तल केली जात असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात गोहत्या बंदी फक्त नावालाच आहे का? असा सवाल विश्व हिंदु परिषदेचे प्रशांत डोरले यांनी केला आहे. बीड शहराजवळील पिंपरगव्हाण रोड च्या शेवटी करपरा नदीच्या पात्रा जवळ गोवंशाच्या जनावरांची जवळपास २५ ते ३० च्या वर



मुंडकी व जनावरांची कातडी सापडल्याने खळबळ उडाली असून बीड मध्ये गोहत्या होत असल्याचा पुरावाच मिळाला आहे.

चार दिवसापूर्वी बकरीईद सण झाल्याने बकऱ्यासह इतर जनावरे कत्तलसाठी बीड शहरात येणार असल्याने बीड पोलीस प्रशासन सतर्क होते, मागील आठवड्यात उध्दझ पूजा पवार यांनी बार्शी नाका भागात एका वाहनांमध्ये कत्तलसाठी जनावरे येणारा असल्याची माहिती मिळताच ते वाहन जप्त करण्यात आले. तसेच बकरीईद च्या पूर्वसंध्येला मोहम्मदिया कॉलनी एका शेडमध्ये कत्तलसाठी गाई ठेवल्या असल्याची माहिती बीड एसपी पथक व पेठ बीड पोलिसांना मिळाले असता तत्काळ सदरील ठिकाणी जाऊन पोलिसांनी छापा मारून १७ गायींची सुटका केली होती, ह्या सर्व गायींना गोवर्धन गोशाळा, रामगड याठिकाणी पोहोच करण्यात आले होते. हे प्रकरण ताजे असतानाच बीड शहरातील शाहूनगर भागातील करपरा नदीपात्राजवळ झाडामध्ये व नाल्याच्या पात्रात जनावरांची जवळपास २० च्या वर मुंडके व काही ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र पोहीचादेव देवस्थानला साडेचार कोटींचा निधी

### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले शासनाचे आभार

**बीड । प्रतिनिधी**

बीड मतदारसंघ क्षेत्रातंर्गत असलेल्या बीड तालुक्यातील कोळवाडी येथील श्रीक्षेत्र पोहीचादेव या देवस्थानच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत तब्बल ४ कोटी ५४ लाख ५१ हजार रूपयांचा भरघोस निधी मंजूर झाला आहे. याबद्दल बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ग्रामविकास विभाग आणि महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

बीड तालुक्यातील कोळवाडी येथे असलेले श्री क्षेत्र पोहीचादेव हे देवस्थान पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. ग्रामीण भागातील हे देवस्थान असल्यामुळे याचा विकास होणे गरजेचे होते. या भागातील नागरिकांकडून याबाबत सातत्याने मागणी होत होती. ही बाब लक्षात घेता बीड जिल्हा परिषदेकडून, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून या देवस्थानच्या विकासाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात



आला होता. याबाबत आ.संदीप ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाण्याच्या टाकीचे थांबवलेले काम तात्काळ चालू करा–अजित शिनगारे



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरासाठी पाणीपुरवठा योजनेचे काम युद्धपातळीवर चालू आहे या कामांमध्ये बाजारपेठेसाठी हुतात्मा स्मारक येथे पाण्याच्या टाकीचे काम चालू आहे हे काम त्याजागी करू नये म्हणून धारूर शहरातील काही नागरिकांनी निवेदन दिले होते. पण हुतात्मा स्मारक येथेच बाजारपेठेसाठी योग्य जागा असल्याने या जागेवरच पाण्याची टाकी उभा कराची यासाठी शिवसेनेचे अजित शिनगारे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन मागणी केली आहे मागणीची दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशाराही यावेळी दिला आहे.

धारूर शहराच्या दृष्टीने नव्याने पाईपलाईनचे काम चालू आहे, यासाठी शहरात दोन ठिकाणी पाणी साठवण करणे आवश्यक असल्याकारणाने एका टाकीचे कसबा भागातील तलवा जवळील ठिकाणी पाणी साठवण टाकीचे काम चालू आहे. तर पेठ विभागासाठी हुतात्मा स्मारक या ठिकाणी चालु आहे, हुतात्मा स्म ारक हे ठिकाण शहराच्या उंच ▶▶ उर्वरित पान २ वर

## क्या हुवा तेरा वादा ? म्हणत शिवसैनिकांसह शेतकऱ्यांचे राष्ट्रीय महामार्गावर जनआंदोलन

### जनसामान्यांची फसवणूक करणारे सरकार : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

महायुती सरकार जन साम ान्यांची फसवणूक करून सत्तेवर आले आहे. निवडणुकी पूर्वी जी आश्वासने दिली त्याला तिलांजली देऊन, हे फसवे सरकार स्थापन झाले आहे. या आघाडी सरकारला त्यांच्याच फसव्या घोषणाची आठवण करून देण्यासाठी आज विधानपरिषदे चे विरोधी पक्ष नेते आंबादासजी दानवे यांच्या आदेशानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिक व शेतकऱ्यांनी आज बीड शहर बायपास वरील महामार्गांवर रास्ता रोको आंदोलन केले.



शेतकऱ्यांना कर्ज मुक्त करून, शेतकरी सन्मान योजनेतून पंधरा हजार रुपये देण्याची घोषणा, लाडक्या बहिणींना पंधराशे ऐवजी एकविशे देणार, शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा देऊन प्रत्यक्ष खात्यावर नुकसान भरपाई देणार, वृद्ध पेन्शन धारकांना एकवीसशे रुपये देणार होते, शेतीला चोवीस तास विज, हर घर जल – हर घर छत या सारख्या शेकडो फसव्या घोषणा करून सामान्य जनता, महिला, शेतकऱ्यांची दिशाभूल करून हे सरकार सत्तेवर आले. या सरकारला त्यांच्याच घोषणाची जाणीव करून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी शिवसैनिक, शेतकरी व महिलांना एकत्रित करत बीड शहर बायपास, महालक्ष्मी चौक या ठिकाणी राष्ट्रीय महामार्गांवर रास्ता रोको करून जन आंदोलन केले.

यावेळी महिला जिल्हा संघटक मीराताई नवले, सोपान काका मोरे तालुका प्रमुख शिरूर, मुकुंद शिंदे तालुकाप्रमुख पाटोदा, अजय दाभाडे बबलू दिवे तालुकाप्रमुख गेवराई,संजय महाद्वार ,हनुमान जगताप, सुशील पिंगळे, राजू मोहाले, रतन गुजर, दीपक बाप्पा मोरया, अशोक हिरडे, अशोक जाधव, कृष्णा चौरे, तात्या रोडे, पंकज कुटे, अजिंक्य डोरले, रवी वाघमारे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थानात मानाचे शुभ्र अश्व अर्पण सोहळा थाटात पार पडला

### माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने अश्व अर्पण; परमपूज्य विठ्ठल महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत धार्मिक विधी संपन्न



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील प्रसिद्ध व श्रद्धास्थान असलेल्या श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड संस्थान येथे एका विशेष धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या वतीने गड संस्थानास मानाचे दोन पांढरे शुभ्र अश्व अर्पण करण्यात आले. या अश्वांचे परम पूज्य ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत विधीवत पूजन व स्वागत करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम दरम्यान मंत्रोच्चार, भजन, कीर्तन व पारंपरिक वाद्यांच्या गजरात भाविकांनी भक्तिभावाने सहभाग घेतला. या पूजेसाठी विविध भागांतून आलेले शेकडो भक्तगण, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते डॉ. अजय दादा धोंडे, जि.प. सदस्य रामराव खेडकर, ▶▶ उर्वरित पान २ वर

# आधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी परिवहन मंत्री सरनाईक यांना मराठी पत्रकार परिषदेचे निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सर्व आधी सुकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले.

बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृतीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या



गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी–स्लीपर बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाड्यांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही.

आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन म हाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, सम न्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.




CMYK